**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- VII | ISSUE- I | JANUARY | 2020 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 6.293 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# यवतमाळ जिल्ह्यातील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचे अभिक्षेत्रीय विश्लेषण (१९९१-२०११) एक भौगोलिक अभ्यास

**प्रा.डॉ. ए. यू. नागरगोजे**
सहाय्यक प्राध्यापक,भूगोल विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

## १.१ प्रस्तावना

कोणत्याही प्रदेशाचा विकास तेथील संसाधनावर अवलंबून असतो. या संसाधनांचे वर्गीकरण नैसर्गिक, मानवी व सांस्कृतिक अशा तीन प्रकारात करण्यात येते. नैसर्गिक संसाधनाचा विकास आणि उपयोग हा शेवटी मानव व सांस्कृतिक संसाधनावरच अवलंबून असतो. म्हणूनच प्रदेशातील लोकसंख्येची विविध वैशिष्ट्ये आणि त्यांची योग्यता प्रादेशिक विकासात महत्त्वाची असते.

अनेक भूगोलतज्ज्ञांच्या योगदानामुळे आज लोकसंख्या भूगोलाला भूगोलशास्त्रात एक स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे. या योगदानात ट्रेवार्था जी.टी., जेम्स पी.ई., क्लार्क जे.आय. आदींचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. या सर्वांनी लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांच्या अभिक्षेत्रीय वितरणावर आणि त्यामागच्या कारणांवर भर दिला आहे. तर संसाधन भूगोलाच्या क्षेत्रात झेलेस्कीचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. भारतात चंदना आणि सिद्धू या लेखकद्वयांनी लोकसंख्या भूगोलाचे एक सविस्तर पुस्तक लिहिले असून याविषयीचे सविस्तर विवेचन केले आहे.

## १.२अभ्यासक्षेत्र

प्रस्तुत अभ्यासाकरिता यवतमाळ जिल्ह्याची निवड केली असून या जिल्ह्याचे अक्षांश १९°२६’ ते २०°४२’ उत्तर व रेखांश ७७°१८’ ते ७९°९८’ पूर्व असून क्षेत्रफळ १३५८४ कि.मी. असून तो क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात १८ व्या स्थानावर आहे. तर लोकसंख्येच्या दृष्टीने १९ व्या स्थानावर असून २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या २७,७५,४५७ इतकी आहे व सरासरी घनता दर चौ.कि.मी. ला २०४ इतकी असून घनतेच्या दृष्टीने हा महाराष्ट्रात सहाव्या क्रमांकावर आहे.

यवतमाळ जिल्ह्यात वेगवेगळ्या उंचीवरचे भाग असून ते समुद्रसपाटीपासून १५० ते ६०० मीटर उंचीवर आहे. नैऋत्य भागात समुद्रसपाटीपासून ४५० ते ६०० मीटर उंचीचा भाग असून येथील डोंगररांगा अजिंठा व बालाघाट टेकड्यांचाच विस्तारीत भाग आहे. डोंगररांगांनी वेढलेल्या नदीखोऱ्याची उंची समुद्र सपाटीपासून १५० ते ३०० मीटर आढळते.

प्रशासकीय दृष्टिकोनातून यवतमाळ जिल्ह्याचे विभाजन १६ तालुक्यामध्ये करण्यात आले आहे. यामध्ये दारव्हा, पूसद, वणी, यवतमाळ, केळापूर, दिग्रस, नेर, बाभूळगाव, महागाव, उमरखेड, राळेगाव, घाटंजी, मारेगाव, कळंब, झरी जामणी व आर्णी या तालुक्याचा समावेश होतो.




## १.३ उद्दिष्टे

१) यवतमाळ जिल्ह्याची प्राकृतिक व आर्थिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) यवतमाळ जिल्ह्याच्या लोकसंख्येची वाढ (१९९१ ते २०११) वितरण व घनता यांचा अभ्यास करणे.

३) यवतमाळ जिल्ह्यातील लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

४) यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी लोकसंख्येचा अभ्यास करणे.

५) यवतमाळ जिल्ह्यातील लोकसंख्येचे संसाधन म्हणून मूल्यमापन करणे.

**१.४ संशोधन पद्धती**

प्रस्तुत विषयावरील शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, मासिके, लेख, वर्तमानपत्रे व इंटरनेट इ. साधनांद्वारे माहिती संकलीत करून विश्लेषण करण्यात आले आहे.

**१.५ लोकसंख्या वृद्धी (१९९१-२०११), वितरण व घनता**

१९९१ ते २०११ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यात लोकसंख्येत एकूण ७२.८२ टक्क्याने वाढ झालेली आहे. या वीस वर्षांच्या काळात यवतमाळ तालुक्यात ९२.२४ टक्क्यानी तर वणी तालुक्यात ५९.५३ टक्क्याने वाढ झाली.

१९९१ ते २०११ या काळाच्या निरनिराळ्या दशकात झालेले बदल वेगवेगळे होते. बहुसंख्य तालुक्यात अलीकडच्या दशकात वाढीचा दर घटलेला दिसतो. पहिल्या दशकात चढत्या दराने वाढ झाली तर पुढच्या दशकात दर कमी झाला. या दोन दशकाच्या काळात लोकसंख्येच्या वितरणात फारसे परिवर्तन झालेले नाही.

भौगोलिक घनतेचा विचार करता मध्य व पश्चिम भागात घनता अधिक आढळते. या भागात दर चौ.कि.मी. ला १०० ते १२० च्या दरम्यान लोकसंख्या आढळते. तर जिल्ह्याच्या पूर्वभागात हेच प्रमाण १०० पेक्षा कमी आहे. १९९१ ते २०११ या वीस वर्षांचा विचार करता २००१ नंतर जिल्ह्यात भौगोलिक घनतेच्या संदर्भात अभिक्षेत्रीय भिन्नता वाढलेली दिसते. ग्रामीण घनतेचाही विचार करता ही घनता त्याचप्रमाणे शेती घनताही या काळात वाढत असलेली दिसते. याचाच अर्थ या काळात ग्रामीण भाग व कृषी क्षेत्रावरील दडपण वाढलेले असून हा एक चिंतेचा विषय आहे.

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येची व्यावसायिक रचना पाहताना प्रथम एकूण लोकसंख्येत प्रत्यक्ष काम करणारे किती याचा विचार केला आहे. इ.स.१९९१ साली एकूण लोकसंख्येत काम करणाऱ्यांचे प्रमाण ४२.२१ टक्के इतके होते. २०११ साली ३६.५७ टक्के इतके होते. म्हणजेच या वीस वर्षात काम करणाऱ्यांच्या प्रमाणात ५.६४ टक्क्याने घट झाली.

१९९१ साली पुरुष गटात काम करणाऱ्यांचे प्रमाण ५४.१२ टक्के इतके होते. ते २०११ साली ४८.४५ टक्क्यापर्यंत कमी झाले. स्त्री कामगारांतील हे प्रमाण २० वर्षात ३०.११ वरुन २८.१९ वर आले. १९९१ साली पुरुष व स्त्री कामगारांच्या प्रमाणात २४.१२ टक्क्यांचा फरक होता. तो २०११ साली २०.२६ टक्क्यापर्यंत कमी झाला.

कामाच्या स्वरूपानुसार काम करणाऱ्यांचे वितरण पाहिल्यास असे आढळते की, १९९१ साली ८६.१४ टक्के काम करणारे प्राथमिक उद्योगात होते तर हेच प्रमाण २०११ या वर्षी ७५.५१ टक्क्यापर्यंत खाली आले. म्हणजे वीस वर्षात प्राथमिक उद्योगातील काम करणाऱ्यांचे प्रमाण १०.६३ टक्क्याने कमी झाले याचा अर्थ द्वितीय व तृतीयक उद्योगातील कामगारांचे प्रमाण या काळात वाढले व जिल्ह्यात प्रामुख्याने तृतीयक उद्योगातील वाढ अधिक दिसते.

**१.६ लोकसंख्येची वैशिष्ट्ये**

जिल्ह्यात २००१ साली जन्मदर दर हजारी १६.८२ इतका होता. मुलांच्या गटात तो १७.९५ तर मुलींच्या गटात १५.६७ इतका होता. यानंतर दहा वर्षांनी जन्मदर २ टक्क्याने वाढला. यावर्षी यवतमाळ तालुक्यात हा दरहजारी २० इतका होता. परंतु काळानुसार ही भिन्नता कमी होत आहे. २००१ या वर्षी जिल्ह्यात मृत्यूदर दर हजारी ४.१० इतका होता. यावर्षी यवतमाळ तालुक्यात हा दर ७.५४ तर पुसद तालुक्यात २.०१ इतका होता. पुढील दहा वर्षात जिल्ह्यात मृत्यूदर थोडा वाढला.

वयोमानानुसार लोकसंख्येची रचना पाहण्यास लहान गटानुसार आकडेवारी उपलब्ध नव्हती. जनगणना पुस्तिकेत केवळ ६ वर्षाखालील मुलांची संख्या दिलेली आहे. २००१ या वर्षी एकूण लोकसंख्येत याचे प्रमाण १४.९६ टक्के इतके होते. यावर्षी महागाव तालुक्यात हे प्रमाण २० टक्के तर यवतमाळ तालुक्यात ९.०६ टक्के इतके होते. इ.स.२०११ मध्ये बालगटातील मुलांचे प्रमाण १५.०१ टक्के इतके होते. म्हणजे २००१ च्या तुलनेत प्रमाण ०.०५ ने वाढले. यावर्षी पुसद तालुक्यात हे प्रमाण १६.५९ टक्के तर घाटंजी तालुक्यात ९.२६ टक्के इतके होते. म्हणजेच या दशकात प्रादेशिक भिन्नता कमी झालेली आढळते.

जन्माचे वेळी मुला-मुलींचे प्रमाण, स्त्री व पुरुषाच्या मृत्यूदरातील फरक व स्थानांतरातील स्त्री-पुरुषांचे प्रमाण यावर लिंग गुणोत्तर अवलंबून असते. जिल्ह्यात हे गुणोत्तर ९५० च्या आसपास असून विकसित भागापेक्षा अविकसित भागात गुणोत्तर स्त्रियांना अधिक अनुकूल आहे.

१९९१ ते २०११ या वीस वर्षात एकूण लोकसंख्येच्या साक्षरतेत २८.७८ टक्क्याने वाढ झाली आहे. १९९१ या वर्षी साक्षरतेचे प्रमाण ३१.६० टक्के होते. ते २०११ साली ६०.६८ टक्क्यावर गेले. शासकीय व खाजगी स्तरावर एकूण

लोकसंख्येच्या विशेषत: स्त्री गटाच्या साक्षरतेचा जास्त प्रसार करण्यात येत असल्याने स्त्री गटाची साक्षरता वेगाने वाढली. १९९१ मध्ये स्त्री गटात साक्षरतेचे प्रमाण केवळ १९.८७ टक्के इतके होते. ते २०११ यावर्षी ५३.१७ टक्क्यावर पोहचते.

**१.७ ग्रामीण व शहरी लोकसंख्या**

प्रदेशातील खेडी व शहरे या वस्त्यांना जमिनीवर विशिष्ट स्थान असते. तसेच याच्या वैशिष्ट्यातही प्रादेशिक भिन्नता आढळते. म्हणून भूगोल विषयात याचे स्थान, वितरण, त्यातील प्रारूप वगैरेंचा अभ्यास करण्यात येतो.

यवतमाळ जिल्ह्यात १९९१ साली एकूण लोकसंख्येपैकी ८६.३१ टक्के लोकसंख्या ही ग्रामीण लोकसंख्या होती. तर २०११ साली हेच प्रमाण ८१.९२ टक्के इतके होते. स्थान वैशिष्ट्यानुसार खेड्यांचे स्वरूप कसे बदलते हे नायगाव, कायर, बोरी व धनकी हे चार खेडी प्रातिनिधिक स्वरूपात निवडून स्थानावर भूपृष्ठ, रस्ते, पाणीपुरवठा याचा कसा प्रभाव असतो हे स्पष्ट केले आहे.

इ.स.२०११ मध्ये जिल्ह्यात एकूण १८५३ खेडी होती. त्यापैकी १६६६ वस्ती असलेले तर १०९ उजाड खेडी होती. बहुसंख्य तालुक्यातून १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या खेड्यांचे प्रमाण अधिक आढळते. तरी पुसद, महागाव, उमरखेड व दिग्रस या चार तालुक्यात अशा लहान खेड्यांपेक्षा मोठ्या खेड्यांची संख्या अर्धी आहे.

जिल्ह्यात महाराष्ट्राच्या अन्य भागाच्या तुलनेत नागरीकरणाचे प्रमाण कमी आहे. १९९१ साली एकूण लोकसंख्येच्या १३.६९ टक्के लोकसंख्या तर २०११ साली २८.७२ टक्के लोकसंख्या नागरी लोकसंख्या होती. याकाळात नागरीकरण वाढले असले तरी नागरीकरणाचा अभिक्षेत्रीय आकृतिबंध कायम आहे. परंतु प्रादेशिक विषमता मात्र वाढलेली दिसते. १९९१-२०११ या काळात या मोठ्या शहराच्या तुलनेत खालच्या वर्गातील लोकसंख्या वाढलेली दिसते.

शहरी लोकसंख्येत लिंग गुणांकातही घसरण होत आहे. सामाजिक मानसिकता याला कारणीभूत आहे. यवतमाळ शहरात हा गुणांक ९५६ तर उमरसरा येथे ८९२ इतका होता. शहरी लोकसंख्येतील अनुसूचित जातींचे प्रमाण २०११ या वर्षी ११ ते १३ टक्क्याच्या दरम्यान व अनुसूचित जमातींचे ६.९८ टक्के इतके होते. एकंदरीत शहराकडे जाण्याची प्रवृत्ती अनुसूचित जमातीपेक्षा अनुसूचित जातीमध्ये अधिक असलेली आढळते. साक्षरतेचा प्रसारही अपेक्षेप्रमाणे शहरी लोकसंख्येत जास्त होता. १९९१ साली साक्षरतेचे प्रमाण ५२.९४ टक्के इतके होते. २०११ साली ७५.०४ टक्क्यावर गेले. शहरी लोकसंख्येत एकूण लोकसंख्येत काम करणाऱ्यांचे प्रमाण २९.१९ टक्के इतके होते. ते २०११ साली ३०.७६ टक्क्यावर गेले. शहरी लोकसंख्येत एकूण लोकसंख्येत जास्त होता. १९९१ साली साक्षरतेचे प्रमाण ५२.९४ टक्के इतके होते. सन २०११ साली ७५.०४ टक्क्यावर गेले. शहरी लोकसंख्येत एकूण लोकसंख्येत काम करणाऱ्यांचे प्रमाण २९.१९ टक्के इतके होते ते २०११ साली ३०.७६ टक्क्यावर गेले. याचा अर्थ वीस वर्षात फारशी प्रगती झाली नाही.

**१.८ लोकसंख्येचे संसाधन म्हणून मूल्यमापन**

लोकसंख्येच्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यांचा विचार केल्यानंतर त्याचा एकत्रित विचार करून जिल्ह्यातील लोकसंख्येचे संसाधन म्हणून मूल्यमापन केले आहे. याकरिता पुढील गमके उपयोगात आणली आहेत. १) लोकसंख्या वाढीचा दर २) २०११ चा मृत्यूदर ३) २०११ चा जन्मदर ४) ६ वर्षाखालील बालकांची संख्या ५) लिंग गुणोत्तर ६) एकूण साक्षरता ७) स्त्री साक्षरता ८) काम करणाऱ्यांची टक्केवारी ९) प्राथमिक उद्योगातील कामगारांचे प्रमाण १०) एकूण लागवड क्षेत्रात सिंचीत क्षेत्राची टक्केवारी.

अशाप्रकारे यामध्ये जैविक किंवा शारीरिक व प्राप्त गुणधर्माचा विचार केला आहे. या सर्व गमकांची तुलना करता यावी यासाठी प्रत्येक गमकास विशिष्ट अधिभार देवून शेवटी अधिभाराच्या एकूण संख्येवरून निर्देशांक काढला आहे व या निर्देशांकांच्या आधारे वेगवेगळ्या तालुक्यातील लोकसंख्येचे मूल्यमापन केले आहे.

लोकसंख्येची उच्च गुणवत्ता एकूण आठ तालुक्यात आढळते. यापैकी एक भाग जिल्ह्याच्या वायव्य भागात तर दुसरा पूर्वेकडे आहे. साधारण गुणवत्तेच्या गटात सहा तालुके येतात. यापैकी चार तालुके पश्चिम भागात दोन जिल्ह्याच्या मध्यभागात आहे. निम्न स्तरावरील निर्देशांक घाटंजी व पुसद या दोन तालुक्यांचा निम्नस्तरीय गटात समावेश होतो.

जिल्ह्याचा एकत्र विचार केला तर निर्देशांक तीस इतका येतो. अर्थात केवळ तौलनिक दृष्ट्या वेगवेगळ्या तालुक्यांचीही स्थिती आढळते.

**१.९ निष्कर्ष**

१) प्रगत महाराष्ट्राच्या विविध भागाची तुलना करता यवतमाळ जिल्ह्यातील लोकसंख्येची क्षमता बऱ्याच खालच्या पातळीवर असलेली आढळते. जिल्ह्याचा बराच भाग डोंगराळ व जंगलव्याप्त असून एकूण समाज

मागासलेला आहे. जिल्ह्यात अनुसूचित जमातींचे आधिक्य आढळते.

२) अभ्यासक्षेत्रातील प्रमुख व्यवसाय शेतीचा आहे व हा पूर्णपणे मान्सूनवर अवलंबून असल्याने अनेकदा शेती उत्पादनात नुकसान होते. शेतीबरोबर शेतकऱ्यांनी जोडधंदे केल्यास त्यांच्या उत्पन्नात स्थिरता येवू शकते. शेतीबरोबर पशुपालन व दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढ्या पाळण्याचा उद्योग, मधमाशीपालन, मासेमारी असे विविध जोडधंदे केले जावू शकतात. परंतु याकरिता शेतकऱ्यांना व्यावसायिक शिक्षण व आर्थिक मदत देणे आवश्यक आहे.

३) समाजात साक्षरता वाढणे हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सामान्य शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण दिल्यास लघुउद्योगांचा विकास होवू शकतो.

४) यवतमाळ जिल्ह्यात प्राकृतिक तसेच सामाजिक व आर्थिक परिस्थितीबाबत बरीच अभिक्षेत्रीय भिन्नता आहे. जिल्ह्याचा जवळ जवळ ३० टक्के भाग डोंगराळ व जंगलव्याप्त असून यादरम्यान नद्यांची अरुंद खोरी आढळतात.

५) जिल्ह्यात लोकसंख्या वाढीचा दर बराच जास्त असून १९९१-२०११ या काळात लोकसंख्या ७२.८२ टक्क्याने वाढले आहे. जिल्ह्याच्या मध्य व पश्चिम भागात घनता जास्त आहे. विशेषत: ग्रामीण भागातील घनता ही वाढताना दिसते.

६) लोकसंख्येत जन्मदर १६.८२ इतका म्हणजेच बराच जास्त आहे. परंतु मृत्यूदर मात्र घटलेला आढळतो. या कारणाने लोकसंख्या वाढताना दिसते.

७) आज एकूण लोकसंख्येत साक्षरतेचे प्रमाण ६०.३८ टक्के इतके आहे. जिल्ह्यात असुचित जाती व जमातीचे प्रमाण अधिक आहे. ज्या तालुक्यातून अनुसूचित जातीचे प्रमाण अधिक आढळते तेथे अनुसूचित जमातीचे प्रमाण कमी असलेले आढळते.

८) जिल्ह्यात नागरीकरणाचे प्रमाण फार आहे. जिल्ह्यातील २६.७२ टक्के एवढी लोकसंख्या वेगवेगळ्या आकाराच्या शहरातून राहते. एकूण महाराष्ट्राशी तुलना करता हे प्रमाण बरेच कमी आहे.

९) जिल्ह्यातील लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्यास शासनाने व सामाजिक संस्थांनी नियोजनबद्धरित्या सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासनाने ज्याप्रमाणे आर्थिक मदतीबरोबरच सामाजिक संरचना निर्माण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शासन आणि सामाजिक संस्थांनी जनजागृती करून आरोग्य सुधारणा, कुटुंब नियोजन, स्त्री साक्षरता अशा विविध क्षेत्रात सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे.

१०) संसाधन म्हणून लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्याकरिता अनेक गोष्टींची आवश्यकता आहे. प्रामुख्याने आधारी संरचनेचा विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. गावागावापर्यंत बारमाही रस्ते गेल्यास वाहतूक व दळणवळण वाढून विकासाला मदत होईल.

### १.१० संदर्भ


१) भारतीय जनगणना अहवाल- २००१, २०११ यवतमाळ जिल्हा

२) यवतमाळ जिल्हा गॅझेटीअर २००१

३) यवतमाळ जिल्हा आर्थिक समालोचन १९९१ ते २०११

४) Trewartha, G.T. (1953) 'A Case Study for Population' Annals of the Association of American Geographers

५) www.yavatmal.nic.in